MHST200000222025

<u>नि.दि.दा.क्र.१३/२०२५ मधील निशाणी क्र.१६ वरील आदेश</u>

वादींनी प्रस्तुतचा अर्ज दाव्यामध्ये दुरुस्ती करणेसाठी दाखल केला आहे.

२. वादी यांनी असे कथन केले आहे की, प्रस्तूतचा दावा त्यांनी तानाजी महादेव चव्हाण यांचा दिवाणी मृत्यू झाला आहे असे जाहीर होवून मिळावे यासाठी दाखल केला आहे. सदर दाव्यातील विनंती कलम ८अ मध्ये "वादी नं.१ व २ यांचे वडील व वादी नं.३ यांचे पती तानाजी महादेव चव्हाण यांचा दिवाणी मृत्यू झाला आहे असे जाहीर होवून मिळावे" अशी मागणी केलेली असताना नजरचुकीने विनंती कलम ८ब मध्ये "वादी नं.१ ते ३ हेच तानाजी महादेव चव्हाण यांचे कायदेशीर वारस आहेत असा वारस दाखला मिळावा" अशी मागणी करण्यात आली आहे. सदर विनंती कलम ८ब यास काट देणे अत्यंत आवश्यक आहे. तसेच त्या अनुषंगाने दावा कलम ४ व दावा कलम ६ मधील अतिरीक्त मजकुर वगळणे आवश्यक आहे. सदरची दुरुस्ती ही तांत्रीक स्वरुपाची असून त्याने दाव्याच्या मूळ स्वरुपात कोणताही बदल होत नाही. त्यामुळे त्यांनी अशी विनंती केली आहे की, सदरचा अर्ज मंजुर करण्यात यावा.

३. प्रतिवादी यांनी सदर अर्जाच्या पाठीमागे त्यांचे म्हणणे दाखल केले आहे. त्यांनी असे कथन केले की, सदर दुरुस्ती करण्याकरीता झालेल्या विलंबाचे कोणतेही कारण अर्जात नमूद केलेले नाही. त्यामुळे त्यांनी अशी विनंती केली की, सदरचा अर्ज नामंजुर करणेत यावा.

४. वादी यांनी प्रस्तुतचा दावा तानाजी महादेव चव्हाण यांचा दिवाणी मृत्यू झाला आहे असे जाहीर होवून मिळावे यासाठी दाखल केला आहे. सदरची दुरुस्ती ही तांत्रिक स्वरुपाची आहे. अशी दुरुस्ती केल्यास दाव्याचे मुळ स्वरुपामध्ये कोणताही बदल होणार

नाही. सदर दुरुस्तीस परवानगी दिल्यास प्रतिवादीचे कोणतेही नुकसान होईल असे मला वाटत नाही. प्रस्तूत दाव्यामध्ये अदयापपावेतो मुद्दे निश्चीत करण्यात आलेले नाहीत. त्यामुळे पुराव्याचे कामकाज चालू झाले नसल्याने दुरुस्ती मंजूर करणे दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ६ नियम १७ अन्वये बंधनकारक आहे. सदरचे प्रकरण हे प्रारंभिक टप्प्यावर असल्याने खर्चाबाबत आदेश पारीत करण्यात येत नाही. सबब, मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे :

## आदेश

१) अर्ज (नि.१६) मंजुर करण्यात येतो.

२) वादी यांनी अर्जात नमुद केलेप्रमाणे १४ दिवसांचे आत दुरुस्ती करुन दावा दुरुस्त प्रत अभिलेखावर दाखल करावी.

३) खर्चाबाबत आदेश नाही.

Digitally signed by ANKUSH ATMARAM PACHARNE
Date: 2026.05.02 12:41:39 +0530

स्थळ : वाई.                                        ( ए.ए.पाचरणे )
दिनांक : ०२.०५.२०२६                              दिवाणी न्यायाधीश व.स्तर, वाई.